**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**दि. ०१.१०.२०१६ रोजीची पुढे ढकलण्यात आलेली सभा**

शुक्रवार, दि. ७.१०.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कदम गंगाबाई नारायण |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलिकर श्रीनिवास आशन्ना |
| कोकाटे नागाबाई भुजंगराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| बियाणी प्रविण बालाप्रसाद | चव्हाण आनंद शंकरराव |
| फारुख अली खाँ इलीयास खाँ | अंजूम बेगम शेख अफरोज |
| मुंढे शांता मोतीराम | आनेवार गंगासागर संदिप |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| कदम शीला सुनिल | प्रमोद मुरलीधराव खेडकर |
| वाजेदा तबस्सुम अथर अली खाँ | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | जिंदम पार्वतीबाई व्यंकटेश |
| उमरेकर अशोक रावण | मुदिराज कमलबाई रामस्वामी |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजिया बेगम अयुब खान |
| सलिमा बेगम नुरुल्लाखान | गाडगे शंकर जयवंतराव |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बालासाहेब गंगाधराव |
| सय्यदा इतरत फातेमा म. मजहर हुसेन | गफार खान गुलाम महमंद खान |
| अनुजा अमितसिंह तेहरा | शर्मा पुष्पाताई राजेश |
| राओत्रे संगिता पृथ्वीराज | गिल सरजीतसिंघ पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | अ. सत्तार अ.गफुर |
| आसीया बेगम अ. हबीब बागवान | स. शेर अली स. महेबुब अली |
| इशरत फातेमा अ. शमीम | कुरेशी चाँद पाशा खाजा |
| तेहसिन बेगम अ.समद | फारुख हुसेन कासीम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस |
| अ. लतीफ अ. मजीद | गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| किशोर किशनलाल यादव | सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक रमेशराव सौदे | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| सौ.ललिता मुंकुंदराव बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजीराव |
| येवनकर विजय हिराचंद | अङ बन शाम वामनराव |
| अल केसरी हसन बिन उमेद | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.शैलजा किशोर स्वामी अ,महापौर हे होते तसेच श्री समीर उन्हाळे आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (विकास), श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, श्री संतोष कंदेवार, मुख्य लेखाधिकारी, डॉ. स्मीता ठाकरे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता(साबांवि). श्री सुगीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**महापौर** — सर्व प्रथम नेहमी प्रमाणे वंदेमातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले

**विरोधी पक्ष नेता** — दिनांक 27.28 व 29 तारखेला शहरातला पाणी पुरवठा करण्यात आला नाही व शहरातील साफसफाई बंद होती ही सफाई जानीव पुर्वक बंद ठेवण्यात आली होती.

**स. सरजितसिंघ गील** — मनपाचे माजी आयुक्त मा. दिपक म्हैसेकर यांचे वडील माजी खासदार, यशवंत महाविदयालयाचे पहिले प्राचार्य, डॉ. गो.रा. म्हैसेकर यांचे वृध्दापकाळाने निधन झाले व तसेच मनपा सदस्य श्री किशोर भवरे यांची आई श्रीमती तुळसाबाई भवरे यांचे निधन झाले त्यांना श्रंध्दाजली अपर्ण करण्याचा मी सभागृहापुढे प्रस्ताव मांडतो यास मान्यता प्रदान करण्यात यावी व श्रंध्दाजली अर्पण करण्यात यावी.

**विरोधी पक्ष नेता** स. सरजीतसिंघ गील यांनी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**अब्दुल सत्तार** नांदेड जिल्हयात पुर आला होता स्वत:चा जीव धोक्यात टाकुन 17 लोकांचे जिव श्री रईश पाशा अग्नीशमन अधिकारी यांनी वाचवला त्याबाबत त्यांचे अभिनंदन करण्यात येते.तसेच मालमत्ता व्यवस्थापक श्री संधू अजितपालसिंघ यांनी मालमतेचा टॅक्सची वसुली रुपये 44 लक्ष केली आहे. त्यामुळे श्री स. अजितपालसिंघ संधु यांचेही अभिनंदन करण्यात येते. आणि मनपाची वसुली खुप करावयाची आहे त्यासाठी सिल मारुन वसुली करण्यात यावी.

**स.सरजितसिंग गिल** आता जे सत्तार सांहेब यांनी जो प्रस्ताव ठेवला आहे त्याला माझे अनुमोदन आहे. स. संधू महाराज व श्री रईस पाशा व 2006 नंतर पहिल्यांदाच गुरुव्दारा मुख्य रस्त्यावर झालेले अतिक्रमन उप आयुक्त श्री संतोष कंदेवार व श्री वाघमारे रत्नाकर यांनी काढले त्यांचे देखील मी अभिनंदन करतो. मा. आयुक्तांचे आदेशान्वये ही सर्व कार्यवाही पुर्ण करण्यात आली त्यांचेही मी अभिनंदन करतो.

**दिपकसिंह रावत** कर्मचा-यांचे मी अभिनंदन करतो तसेच भारतीय सैन्याने पाकीस्तानमध्ये घुसुन पाकिस्तानी सैन्याचा खात्मा केला त्याबददल मी भारतीय सैन्याचे अभिनंदन करतो. सर्व सभागृहाने मान्यता देण्यात यावी.

**अब्दुल सत्तार** आम्ही भारतीय सैन्याचे अभिनंदन करतो.

**अनुजा तेहरा** श्री शेख रईस पाशा हमीदोद्दीन, फायरमन श्री एल.डी. घोरपडे, फायरमन श्री निलेश कांबळे, सहाय्यक फायरमन श्री विक्रम पंडीत, अधिकारी व कर्मचारी यांनी व त्यांच्या टीमचे मी अभिनंदन करते तसेच राष्ट्रपतीपदक मिळण्यासाठी प्रशासना मार्फत उचीत कार्यवाही करावी त्यांनी पुरामध्ये 17 लोक अडकले होते त्यांचे प्राण वाचविले. त्यामुळे त्यांचे पुनश्च अभिनंदन.

**सभागृह नेता** तीन जिल्हयाच्या आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी ही आपल्यावर आहे. आपल्या कर्मचारी यांनी दाखुन दिले की आम्ही सक्षम आहोत म्हणुन त्यांचे मी अभिनंदन करतो. डीपीडीच्या माध्यमातुन दोन पम्पंची मागणी करुन अग्निशमन विभाग हा आणखी बळकट केला पाहीजे. मा. ना. पालकमंत्री साहेबांनी सुध्दा याची माहीती आहे. त्यासाठी डीपीडीसीला प्रस्ताव तयार करुन पाठवावा.

**अनुजा तेहरा** श्री गाडीवाले यांनी ठेवलेल्या प्रस्तावाला माझे समर्थन आहे. अग्नीशमन विभाग हा बळकट केला पाहीजे.

**तुलजाराम यादव** लंगर साहीबचे बाबाजी यांनी नांदेडला ग्रीन सिटी केले आहे त्यांच्या लगंर साहीब गुरव्दारासाठी 25 लक्ष रुपयाची पाण्याची पाईप लाईन मंजूर करावी.

**महापौर** श्री शेख रईस पाशा हमीदोद्दीन अग्नीशमन अधिकारी, फायरमन श्री एल.डी. घोरपडे, फायरमन श्री निलेश कांबळे, सहाय्यक फायरमन श्री विक्रम पंडीत, अधिकारी व कर्मचारी यांनी उत्कृष्ट कामगीरी केली आहे त्याबाबत त्यांचे संपर्ण सभागृहाचे वतीने अभिनंदन संबंधीत अधिकारी कर्मचा-यांना राष्ट्रपती पदक मिळण्यासाठी प्रशासनाने योग्यती कार्यवाही करावी. तसेच श्री संतोष कंदेवार, उप आयुक्त श्री अजितपाल सिंह संधू मालमत्ता व्यवस्थापक, झोन क्र ए चे सहाय्यक आयुक्त श्री गुलाम सादीक यांनी कॅनाल तरोडा वरील अतिक्रमण काढले त्यांचेही अभिनंदन करण्यात येते.

**उमेश चव्हाण** सभागृहाला विनंती राहील की ज्यांनी चांगले काम केले आहे त्यांना एक एक वार्षीक वेतन वाढ मंजूर करण्यात यावी. श्री रईस पाशा अग्निशमन अधिकारी, श्री संतोष कंदेवार, उप आयुक्त, श्री अजितपाल सिंह संधू, मालमत्ता व्यवस्थापक, झोन क्र ए चे सहाय्यक आयुक्त श्री गुलाम सादीक यांचे अभिंनदन करण्यासाठी समोर बालवावे.

**महापौर** मनपा सदस्य श्री किशोर भवरे यांची आई श्रीमती तुळसाबाई भवरे यांचे निधन झाले त्यांना श्रंध्दाजली अपर्ण करण्याचा मी सभागृहापुढे प्रस्ताव मांडतो यास मान्यता प्रदान करण्यात यावी व श्रंध्दाजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र.७४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स,सदस्य श्री किशोर भवरे यांच्या मातोश्री तुळसाबाई भवरे यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते तसेच त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दु:खात सहभागी होते.

**महापौर** मनपाचे माजी आयुक्त मा. दिपक म्हैसेकर यांचे वडील माजी खासदार, यशवंत महाविदयालयाचे पहिले प्राचार्य, डॉ. गो.रा. म्हैसेकर यांचे वृध्दापकाळाने निधन झाले त्यांना श्रंध्दाजली अपर्ण करण्याचा मी सभागृहापुढे प्रस्ताव मांडतो यास मान्यता प्रदान करण्यात यावी व श्रंध्दाजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र.७५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी आयुक्त डॉ. श्री दिपकजी म्हैसेकर यांचे वडील व मराठवाडा विद्यापिठाचे माजी कुलगुरु गो. रा. म्हैसेकर यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते तसेच त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दु:खात सहभागी होते.

**महापौर** भारतातील लषकराच्या तळावर दहशतवायांनी केलेल्या हल्यात मृत पावलेल्या १७ भारतीय जवान शहिद झालेले असुन त्यांना भावपुर्ण श्रंध्दाजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र.७६** **ठराव**

उरी येथील लषकराच्या तळावर दहशतवाद्यानी केलेल्या हल्यात मृत पावलेल्या १७ भारतीय जवांन शहिद झालेले असुन त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**अभिषेक सौदे** भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी काळा पैसा बाहेर काढण्यासाठी १००० व ५०० रुपयाची नोट बंद केल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात येतो तसा ठराव करण्यास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** श्री अभिषेक सौदे यांनी पंतप्रधानांचा अभिन्नदनाचा प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते .

**ठराव क्र.७७**

देशाचा काळा पैसा बाहेर काढण्यासाठी भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी १००० व ५०० रुपयाची नोटी बंद केलेल्या असल्याने त्यांने अभिनंदउन हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते करते.

**महापौर** श्री रईस पाशा अग्निशमन अधिकारी, श्री संतोष कंदेवार,उप आयुक्त, श्री अजितपाल सिंह संधू, मालमत्ता व्यवस्थापक, झोन क्र ए चे सहाय्यक आयुक्त श्री गुलाम सादीक यांनी सत्कार स्विकारण्यासाठी समोर यावे. अभिनंदन करण्यात आले.

**ठराव क्र.७८** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अग्नीशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी कंधार तालुक्यातील डोंगरगांव येथे लिंबोटी धरणाच्या पुराच्या पाण्यात अडकलेल्या माणसांना काढण्यासाठी अग्नीशमन अधिकारी श्री शेख रईस पाशा हमीदोद्दीन, फायरमन श्री एल.डी. घोरपडे, फायरमन श्री निलेश कांबळे, सहाय्यक फायरमन श्री विक्रम पंडीत, अधिकारी व कर्मचारी यांनी उत्कृष्ट काम केलेले असुन उक्त धरणाच्या पुरामध्ये रात्रीच्या वेळी झाडावर बसलेल्या पुरुष व स्त्रीसह ०६, आखडया मध्ये आडकलेल्या पुरुष / स्त्री / लहान मुले असे १० नागरीक असे एकूण १६ नागरीकांना रात्रीच्या वेळी पुरात अडकले होते त्यांना आपत्ती व्यवस्थापनच्या सहाय्याने लाईनफजॅकेट, लाईफरिंग, रेस्कयु रोप, तराफे व इतर साहित्याने आपले तिव धोक्यात घेवुन वरील १६ नागरीकांना सुखरुप व सरुक्षीतपणे बाहेर काढले त्या बद्दल संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे हार्दीक अभिनंदन करण्यात येते सदरचे काम अतिशय जोखमीचे काम केल्या बद्दल महाराष्ट्र शासनाचे अग्नीशमन सल्लागार यांचे मार्फत राष्ट्रपतीचे अग्निशमन सेवा शौर्य पदक (President`s Fire Service Medal for Gallantry) देण्यासाठी ही नावाशमनपाकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते शिफारस करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अधिकारी श्री संतोष कंदेवार, उप आयुक्त, यांनी तरोडा येथील कॅनलजवळ असलेला अतिक्रमण काढले तसेच कर आकारणीची वसुलीही विक्रमीय केल्यामुळे त्यांचे हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**ठराव क्र.७९** **ठराव**

श्री संतोष कंदेवार, मुख्य लेखाधिकारी तथा उप आयुक्त, यांनी तरोडा येथील कॅनलजवळ असलेला अतिक्रमण काढले तसेच कर वसुलीही विक्रमीय केल्यामुळे त्यांचे हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**महापौर** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अधिकारी श्री स. अतिजपालसिंघ संधु, मालमत्ता व्यवस्थापक तथा विधी अधिकारी यांनी मनपाकेच्या मालकीतील भाडेकरु मार्फत येणारी कर वसुली विक्रमीय केल्यामुळे त्यांचे हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**ठराव क्र.८०** **ठराव**

श्री स. अजितपालसिंघ संधू, मालमत्ता व्यवसथापक तथा विधी अधिकारी, यांनी मनपाकेच्या मालकीच्या भाडेकरु मार्फत येणारी कर वसुली विक्रमीय केल्यामुळे त्यांचे हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**विरोधी पक्ष नेता** दसरा हा हिंदुचा मोठा सण असल्याने कचरा उललेला नाही. पाणी सोडले नाही हा भेदभाव का होत आहे. इतर सणाला पळु पळु अधिकारी काम करता आमच्या सण असे का होते. मला माहिति मिळाली की एटुझेड वाल्याने काम बंद केले आहे. तो एटुझेड कंपनी ही सणाच्या वेळी काम बंद का करते त्या कंपनीवर आपण काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

**उमेश चव्हाण** जातीवाद कोणत्या ठिकाणी झाला असे जातीवादी कृते झालेले नाही असे मला वाटते. नेहमी असेच हे करतात. सभागृहात गोंधळ सुरु होता.

**अब्दुल सत्तार** प्रश्नोउत्तराचा तास चालू करण्यात यावा.

**उमेश चव्हाण** विकासाची बात करावी. जातीवादी शब्द वापरण्यात येवू नये. त्यामुळे प्रथम प्रश्ननउत्तराचा तास चालू करावा. पुन्हा गोंधळ चालू होता.

| स.सदस्यांचे नांव | प्रश्न | प्रशासनाचे उत्तर |
|---|---|---|
| **सौ. संगिता पृथ्वीराज राओत्रे** | प्रभाग क्रं. २३ मध्ये जवळपास १०० मिटर ड्रेनेजलाईन टाकणेसाठी मी मा. आयुक्त साहेबांना व संबंधीत विभाग प्रमुखांकडे अनेकवेळा पत्रव्यवहार केला परंतु अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही सदरील प्रकरणी कधी कार्यवाही होणार याची माहिती देणे. | प्रभाग क्र. 23 मध्ये अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील लाईन टाकण्याची कार्यवाही निधीची तरतुद करुन सदरील ड्रेनेज लाईनचे काम हाती घेण्यात येईल |

| | | |
|---|---|---|
| **अ.हबीब अ. रहीम बागवान** | जेएनएनयुआरएम, गुरू-ता-गद्दी योजने अंतर्गत रस्ता क्रं ९ ते मुख्य जलवाहीनी देगलूर नाका पर्युंत मुख्य मलवाहीनी टाकण्यात आलेली आहे. तसेच बिएसयुपी योजने अंतर्गत या लाईनलगत वसाहतीमध्ये मलवाहीनी टाकण्यात आलेली आहे. परंतू या लाईनवरील मध्येच राहीलेले एक चेंबर का बांधण्यात आलेले नाही व अंतर्गत लाईन मुख्य वाहिनीस का जोडण्यात आलेले नाही. | ड्रेनेजच्या चेंबरची खोली ही 15 ते 20 फुट बांधकाम करावयाचे असल्याने व तो भाग अत्यंत दलदलीचा आहे. त्या मुळे ड्रेनेज चेंबरचे काम करण्यास अडचण निर्माण होत आहे. सदरील काम डिसेंबर 16 पर्यंत पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येईल. |
| **सय्यद शेर अली महेबुब अली** | जेएनएनयुआरएम, गुरू-ता-गद्दी योजने एनटीसी मिल पासुन ते देगलुर नाका येथील तीन जलकुंभापर्यंत पर्यायी रायजिंग मेन टाकण्यात आलेली आहे. जेणेकरुन सदरील रायजिंग मेनवरील असलेले यात्री निवास, शक्ती नगर, खुदबई नगर टंचिग ग्राऊंड, बोंढार जलकुंभ सुरळीत भरण्यासाठी एक पर्यायी रायजिंग मेन टाकण्यात आलेली होती, लाखो रुपये खर्च करुन सुध्दा आतापर्यंत या रायजिंग मेनची जोडणी का करण्यात आलेली नाही. | यात्री निवास, शक्तीनगर, खुदबईनगर, ट्रंचींग ग्राऊंड व बोंढार हे 5 जलकुंभाव्दारे देगलुररोड वरील अस्तित्वातील रायजिंगमेन मधुन पाणी पुरवठा करण्यात येतो.<br>JNNURM योजनेअंतर्गत मिल कॉर्नर ते देगलुरनाका चौक पर्यत नविन रायजिंगमेन लाईन टाकण्यात आली असून याच रस्त्यावरील असलेल्या जुन्या रायजिंगमेनला 4 जागी जोडणी करुन ग्रीड करणे असे प्रस्तावित होते. या योजनेअंतर्गत पाईपलाईनचे काम झाले. परंतु जोडणीची कामे झालेली नाहीत. JNNURM योजनेतील पुढील निधी शासनाकडून अद्याप अप्राप्त आहे.<br>पाईप लाईनची ग्रीड झाल्यास हे जलकुंभ कमी वेळात भरु शकतील. या कारणास्तव मनपाचे AMRC चे कंत्राटदार इन्द्रजा कन्स्ट्र. यांचे मार्फत हे जोंडणीचे रु.16.96 लक्षचे काम मनपा निधीतून करणे करीता मा.आयुक्त यांची मान्यता झाली आहे.<br>त्यानुसार कंत्राटदाराने जोडणीसाठी लागणारे साहित्य तयार करुन घेतले आहे. परंतु जोडणीचे कामासाठी जुनी रायजिंगमेन बंद करणे, कट करणे, Score करणे इ. साठी उत्तर नांदेड भागाचा 48 तास पाणी पुरवठा बंद ठेवावा लागेल. तसेच दरम्यानच्या काळात शहरातील पाणी टंचाई व नंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे जोडणीचे काम झालेले नाही. पाणी पुरवठा रायजिंगमेन लाईनला जोडणीचा कार्यक्रम आखणी करुन हे काम लवकरच हाती घेवून पूर्ण करण्यात येईल. |
| **अ. हबीब अ. रहीम बागवान** | १) बिएसयुपी योजने अंतर्गत ब्रम्हपुरी येथील विकास कामे सात दिवसाचे आत चालू करण्यात येईल असे आश्वासन मागील सर्वसाधारण सभेत आश्वासन देण्यात आले होते तरी परंतु अद्याप पर्यंत काम चालू करण्यात आलेले नाही त्याचे कारण काय | बीएसयुपी अंतर्गत न्यु ब्रम्हपुरी येथील अर्धवट शिल्लक कामे सुरु करणे बाबत १०.०८.१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये सदरील विषयावर सविस्तर चर्चा झाली होती सभेतील चर्चेदरम्यान ठरल्यानुसार सदरील भागातील कामे सुरु करणेसाठी कामातील अडचणीच्या अनुषंगाने कंत्राटदारा समवेत क्षेत्रीय पाहणी करण्यात आली ज्यामध्ये जुन्या अस्तित्वातील JNNURM, नगरोत्थान अंतर्गत टाकण्यात आलेलया ड्रेनेज लाईन्स व चेंबर्स पुर्णतः चोकअप झाल्याने सदरील ड्रेनेज लाईन्स याच विभागाकडून पुर्ववत करणेसाठी उध्दवणा-या अतिरिक्त बाबी इत्यादी बाबत उपआयुक्त (विकास) यांचे समवेत सविस्तर चर्चा करुन व कामाची Priority ठरवुन दि. २९.०८.१६ पासुन सदरील भागातील ड्रेनेज लाईनचे कामास सुरुवात करण्यात आली आहे तथापि सद्या पावसाळयाचे दिवस असल्याने पावसामुळे कामाच्या गातीवर परिणाम होत आहे आजपर्यंत टाकण्यात आलेल्या ड्रेनेज लाईनच्या कामाची तपशिल खालील प्रमाणे आहे<br>**<u>१) मोसंबी मळा भागासाठी:-</u>**<br>अ) ३०० मीमी व्यासाची २६० मी. लांबी<br>ब) आरसीसी चेंबर्स बांधकाम ९ नग<br>**<u>२) मिल्लतनगर भागासाठी:-</u>** |

| | | |
|---|---|---|
| | (५)<br>२) बिएसयुपी योजने अंतर्गत ब्रम्हपुरी येथे विकास कामे करणा-या एजन्सीस दंड का लावण्यात आला नाही व सदर कामास विलंब होत असल्यामुळे सदर एजन्सीस काळया यादीत का टाकण्यात आले नाही. | अ) १६० मीमी व्यासाची ६४० मी.लांबी<br>ब) आरसीसी चेंबर्स बांधकाम २६ नग<br>३) जुनी ड्रेनेज लाईन्सवरील चेंबर्सची सफाई करणे ६० चेंबर्स<br>४) जुनी ड्रेनेज लाईन्ची सफाई १.२० कि.मी.<br><br>बीएसयुपी अंतर्गत न्यु ब्रम्हपुरी येथील घरकुलाचे व मुलभुत सुविधाचे कामास विलंब होत असल्याने कंत्राटदार मे. पंधे इन्फ्राकॉन्स प्रा.लि. सोलापुर यांना आतापर्यंत रु. ३७,१७,५००/- एवढा दंड आकारण्यात आला आहे कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याचे अधिकार या विभागाकडे नसु ठेकेदारीचे प्रमाणपत्र वितरीत करणा-या विभागाकडे आहे. |
| **फारुख हुसेन कासीम साब** | प्रभाग क्रं २८ मध्ये इतवारा भागात मच्छी मार्केट येथे पाणी पुरवठा लाईन टाकणे व याबाबत मा. महापौर व मा. आयुक्त यांना लेखी पत्राव्दारे कळविले तरीही अदयापपर्यंत काणतेही कार्यवाही करण्यात आलेली नाही | <u>मच्छी मार्केट संघसेन नगर समोरील गल्ली (घर क्र.7-4-65 ते 7-4-72)</u> सदर ठिकाणी खात्याचे C I पाईप्स (व्यास = 80 मी.मी,लांबी = 40 मी) AMRC कंत्राटदाराकडुन टाकुन घेवुन शक्तीनगर जलकुंभाद्वारे पाणीपुरवठा करण्यात आले. परंतु पाणी पुरवठाचे दाब कमी असल्याची तक्रार प्राप्त झाली. याचे कारण मुख्य जलवाहिणी रस्त्याच्या पृष्ठभागापासुन चार फुट खोल असल्याची शक्यता असावी. संघसेननगर भागाला पाणीपुरवठा करणा-या जलवाहिणीस जोडुन घेण्यासाठी कार्यालयीन मान्यतेनुसार AMRC कामगारांना लावण्यात आले. परंतु संघसेननगर भागातील रहिवाश्यांनी प्रस्तावीत क्रॉस कनेक्शनला चार वेळेस विरोध दर्शवुन जोडणीचे काम करु दिलेले नाहीत. सदर बाबतीत मा.फारुख हुसेन काशिमसाब (सं.सदस्य प्रभाग क्र.28 मनपा) यांना भागातील रहिवाश्यांची समजुत काढुन आवश्यक सहकार्य देण्यास विंनती करण्यांत आली. विषयांकीत भागात सद्यस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत होत असुन ऊन्हाळयातील पाण्याची कमतरता निर्माण होऊनये म्हणुन भाजीमंडीकडुन येणा-या जलवाहिणीस जास्त दाबाने पाणीपुरवठा करण्यासाठीचा प्रस्ताव कार्यालयीन मान्यतेच्या प्रक्रीयेत आहे.प्रस्तावीत काम मान्यतानुसार त्वरीत हाती घेण्यात येईल.<br><u>2) फिश मार्केट मधील गल्लीच्या शेवटच्या टोकास पाणीपुरवठा समस्या बाबत.</u> सदर गल्लीला शक्तीनगर जलकुंभाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येते. सदर भागास पाणीपुरवठा करणारी मुख्यजलवाहिणी मॅफको रोड पासुन संघसेननगर मधुन टाकण्यात आलेली आहे. टेलयेन्डला पाण्याची कमतरता असल्यामुळे पाण्याचे दाब वाढविण्यासाठी AMRC कंत्राटदाराकडुन संघसेननगरच्या ठिकाणी नविन क्रॉस कनेक्शन करुन घेण्यात आलेले आहे. परंतु आवश्यक प्रमाणात दाब वाढलेले नसल्यामुळे मच्छीमार्केट भागात अस्तीत्वात असलेली जलवाहिणी काढुन जास्त खोलावर उतार करुन टाकण्यासाठी AMRCकंत्राटदारांचे कामगार लावण्यात आले होते. परंतु सदर भागातील रहिवाश्यांनी सी.सी. रस्ता तोडुन काम करु देणार नाही असी भुमीका घेतल्यामुळे काम रखडलेले आहे. एकदंरीत प्रशासनाकडुन दोन्ही प्रकरणात वेळोवळी काम पुर्ण करुन घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आली असुन क्षेत्रावर कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होऊनये याची परिपुर्ण दक्षता घेण्यात आलेली आहे. प्रशासनाकडुन काम पुर्ण करुन घेण्याचे मानस असुन स.सदस्य मनपा यांच्याकडुन भागातील रहिवाश्यांना विश्वासात घेण्याचे अपेक्षित सहकार्यप्रमाणे कामे हाती घेवुन त्यास पुर्ण करणे शक्य होईल. |
| **आनंद चव्हाण** | 1) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हदीतील कैलाश नगर, शाहू नगर वर्कशॉप येथून येणा-या ड्रेनेजचे घाण पाणी वाहत जाऊन नालीत रुपांतर होत आहे. त्यामुळे दि २७.०६.२०१६ दि १९.०७.२०१६ व दि १९.०७.२०१६ रोजी पत्र दिले होते, याबाबत काय कार्यवाही करण्यात आली ?<br>२) आनंद नगर चौक वसंत नगर भागात पाणी साचते, यावर कोणती कार्यवाही करण्यात आली.<br>३) मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं २१५ दि. २४.०३.२०१५ बाबत दि. ०२.०७.२०१६ रोजी पत्र दिले आहे, त्यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे. | वर्कशॉप व तरोडा नाक्यापासून पोलिस कॉलनी पर्यंत मलवाहीनी प्रवाह सुरळीतपणे वाहत आहे. सदर मलवाहीनी पोलिस कॉलनी कमाणी पासुन कॉलनी मार्गे सावित्रीबाई फुले शाळा मार्गे बाबानगर ते वसंतनगर चौक ते देना बँक ते नागार्जुना हॉटेल अशी JNNURM अंतर्गत मलवाहीनी झालेली असून मलप्रवाह सुरळीत आहे. पाऊसा दरम्यान सदर वाहिणी लगत असलेल्या नाल्याच्या पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने ओव्हरफ्लो होतो व ते पाऊसाचे पाणी मलवाहिणीमध्ये जाते व यामुळे रस्त्यावर मलवाहिणी ओव्हरफ्लो होत आहे. पाऊस कमी झाल्यानंतर ओव्हरफ्लो होणारे पाणी बंद होते. या मलवाहीनीच्या काही भागात मलप्रवाह सुरळीत होत नसल्यास आवश्यकतेनूसार मलवाहीनी दुरुस्ती/ साफसफाई करण्यात येईल. |
| **डॉ.विश्वास बालाजीराव कदम** | १) नांदेड शहरातील जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतींची पाहणी करुन त्यावर योग्य ती उपाययोजना करण्याबाबत दिनांक २७.०८.२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेमधील विषय पत्रिकेमध्ये अ.क्रं.वर याबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सदरील ठराव संमत हाऊन शहरातील जुन्या व जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने संमत झालेल्या ठरावानुसार अद्ययापपर्यंत प्रशासनाकडून काय कार्यवाही झाली याची सविस्तर माहिती देणे.<br><br>) नांदेड शहरात सद्यस्थितीत मुख्य व अंतर्गत रत्यांवर जागोजागी कचरा दिसतो, तो कचरा रस्त्यांवर व मोकळया जागेत टाकण्यात येतो ज्यामुळे सर्वत्र घाण पसरत आहे. ते टाळण्याकरीता कचरा संकलित करण्यासाठी कचराकुंडी का ठेवण्यात येत नाही? याबाबत सविस्तर माहिती खुलासा करण्यात यावा. तसेच शहरातील कचरा संकलन व व्यवस्थापनाचे काम सध्या कोणामार्फत केल्या जाते याची माहिती देण्यात यावी. | क्षेत्रीय कार्यालय **ब शिवाजीनगर/ अशोकनगर** अंतर्गत जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतींची पाहणी वसुली लिपीक यांच्या मार्फत केली असता या क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत केवळ १ इमारत त्याचा मालमता क्रं १-६-५० असुन त्याचे मालमताधारक श्री भगवान रघूनाथ कांबळे रा जनता नगर कॉलनी यांना नियमानुसार जा.क्रं. ३३७/१६ दि १३.०५.२०१६ अन्वये सदर इमारत पाडून घेण्याबाबत नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार संबंधीतांनी सदरची इमारत स्वताहुन पाडुन घेतली आहे.<br><br>सद्यस्थितीत मुख्य व अंतर्गत रस्त्यावर जागोजागी कचरा दिसतो कांही कांही तांत्रीक कारणाचे कचरा संकलण करणारे वाहन एखाद्या प्रभागात वेळेवर जावू न शकल्याने नागरीक कचरा रस्त्याच्या कडेला अथवा मोकळया जागेत टाकतात त्या भागातील कचरा एखाद्यावेळी विलंबाने भरुन घेण्यात येतो धनकचरा व्यवस्थापन नियम-२००० ची अमलबजावणी करुन शुन्य कचरा परिसर निर्मीती करणेसाठी कचराकुंडया हटविण्यात येवून त्याऐवजी घंटागाडीव्दारे घरोघरी जावून कचरा संकलण करण्यात येते व क्षेत्रीय कार्यालय-ब शिवाजीनगर / अशोकनगर अंतर्गत कचरा संकलन व व्यवस्थापनाचे काम सध्या ए टु झेड कंपनी मार्फत केल्या जाते. |
| **डॉ.ललिता मुकूंद बोकारे** | सध्या शहरामध्ये रोगराईची साथ पसरली असून महापालीकेच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा मोठया प्रमाणावर तुटवडा असल्यामुळे गोरगरीब/गरजू रुग्णांचे हाल होत आहेत व ते रुग्ण इतर दवाखान्यामधुन उपचार घेत आहेत. यावर काय उपाय योजण्यात येणार याची माहीती देणे. | मनपाकेच्या अंतर्गत सार्वजनिक दवाखाने कार्यरत आहेत त्या दवाखान्यामध्ये येणा-या रुग्णांची औषधीविना गैरसोय होवू नये म्हणुन मनपाकेने औषधी व इतर साहित्याची मागणी महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत औषधी व इतर साहित्याची मागणी केली आहे त्यानुसार त्यांनी औषधी पुरवठा करण्यात येईल असे सांगितले आहे व तसेच मनपाकेच्या वतीने सोलापुर मनपा व जिल्हा शल्यचिकित्सक आरोग्य विभाग नांदेड महाराष्ट्र शासन यांच्याकडुन औषधीचा पुरवठा |

| | | |
|---|---|---|
| | (७) | केला आहे सदरील औषधी मनपाकेच्या सर्व दवाखान्यात पुरवठा करण्यात आला आहे व तसेच मनपा स्तरावरुन औषधीची खरेदी करण्यात आली आहे सदरील औषधी १० ते १५ दिवसात प्राप्त होणार आहे. |

**सभागृह नेता** विरोधी पक्ष नेता यांनी जो प्रश्न पाण्याचा उपस्थित केला आहे ती बाब योग्य आहे पाणी आले नसेल कोणत्याही धर्माचा सण असो पाणी पुरवठा विभागाने केला पाहिजे. पाणी पुरवठा झाला नसल्याने त्यांनी संबधीत अधिकारी यांना फोन केला असेलच यात शंका नाही. सणा सुदीच्या दिवशी सर्वाना पाणी मीळाले पाहीजे. यात प्रशासनाने भेदभाव करु नये. मला वाटते प्रशासन भेदभाव करीत नाही. प्रशासनाच्या काही चुकीमुळे पाणी पुरवठा होवू शकला नसेल त्यात काही अडचणी असतील. कच-याच्या बाबतीत एटुझेड कपनी ही नेहमी सण आला की संप करण्याची त्याला सवय झालेली आहे. तो संप करतो आणि त्याचे पैसे घेण्यासाठी संप करतो हे अगदी बरोबर आहे. असे भविष्यात होवू नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

**विरोधी पक्ष नेता** आम्ही बाहेर पडले की नागरीक आम्हाला विचारतात की कच-यावाला आला नाही. लोकांचा संताप वाढत चालला आहे. लोक आम्हाला विचारीत आहे. आमच्या अंगावर कचरा घ्यावा असे कळत नाही. त्याच पेमेट देवून टाका. दुसरी कंपनी बोलवा ना. आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढे चला असे मला वाटते. त्याला तात्काळ काढून टाका.

**दिपकसिंह रावत** पाण्याचा प्रश्न निर्माण झाला तो तुरटी नसल्यामुळे निर्माण झाला होता कारण आपल्या कडे तुरटी संपल्याची माहिती मला मिळाली आहे. स्थायी समितीमध्ये दोन सदस्यांनी तुरटीच्या संदर्भात प्रस्ताव टाकला होता. त्याची चौकशी सुरु झाली आहे. प्रशासन म्हणते की पाणी नसल्यामुळे पाणी पुरवठा होवू शकला नाही मला वाटते तुरटी नसल्यामुळे पाणी पुरवठा होवू शकला नाही. प्रशासनाकडे तुरटी उपलब्ध नसल्यामुळेच पाणी पुरवठा केला नाही ही बाब सत्य आहे असे मला वाटते. तर प्रशासनात काम करणा-या अधिका-यावर काय कार्यवाही करणार याचा खुलासा करण्यात यावा.

**उमेश चव्हाण** आता माझा विरोध हा विरोधी पक्ष नेता यांनी जी जातीवादी भुमीका प्रशासनाने घेतली असे म्हणाला होते त्याना माझा विरोध आहे. कारण प्रशासन हे जातीवादी नसते. स्थायी समिती मध्ये एक ठराव पारीत केला आहे की मुलभुत सुविधा साठी प्रशासनाने खरेदी करण्याची कार्यवाही करावी. प्रशासन म्हणते की पाणी नसल्यामुळे पाणी पुरवठा होवू शकला नाही मला वाटते तुरटी नसल्यामुळे पाणी पुरवठा होवू शकला नाही. प्रशासनाकडे तुरटी उपलब्ध नसल्यामुळेच पाणी पुरवठा केला नाही माझे असे मत आहे. येणा-या स्थायी समितीमध्ये चौकशी अहवाल घेणार आहे. प्रशासन यात काय भुमिका घेते. समितीचा अहवाल काय येते यावर अवलबूंन आहे. स्वच्छतेवर जास्त लक्ष दयावे.

**विरोधी पक्ष नेता** शहरात साफसफाई होत नाही हे सर्वाचे म्हणने आहे. का स्वच्छता होत नाही.

**सौ. श्रध्दा चव्हाण** शहरात साफसफाई योग्य पध्दतीने होत नाही हे खरे आहे. शहरातील सफासफाई कडे प्रशासनाने लक्ष दिले पाहीजे.

**बाळासाहेब देशमुख (तरोडा)** शहराला मुलभुत सुविधा देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. सुविधा पुरवित नसेल तर काय उपयोग आहे. आम्ही पाण्याचा टॅक्स भरत नाही काय हे सांगावे. सर्वात जास्त टॅक्स तरोडयाने भरला आहे.

**बराच वेळ गोंधळ सुरु होता.**

**महापौर** सगळयाचे जिव्हाळयाच्या प्रश्नासाठीच मनपात येत असतात आता मा. आयुक्त यांना खुलासा करण्यासाठी बोलू दयावे. सर्वाचे प्रश्न महत्वाचे आहेत.

**सौ. श्रध्दा चव्हाण** आता खुलासा घेवून काय उपयोग आहे. पाण्याचा विषय महत्वाचा आहे. त्यावेळी समन्वय ठेवणे आवश्यक होते. आता काहीही उपयोग होणार नाही. खुलासा दयावा असे म्हणता हे योग्य नाही.

**बाळासाहेब देशमुख (संविधान पार्टी)** : या विषय पत्रीकेवर दिलेल्या वेळे नुसार चालायचे किंवा नाही हे सांगावे. तशी आता आमचा वेळ सुरु झालेला आहे. त्यासाठी आम्ही आता बोलण्यास सुरुवात करणार आहोत. आपण कोणीही बोलू नये. मा.महापौर यांनी ठरवून दिलेली वेळ आमची आहे.

**स. शेर अली** सर्वाचे प्रश्न जिव्हाळयाचे आहेत. आम्हालाही बोलू दयावे.

**आयुक्त** मा. महापौर यांच्या परवानगीने, जे विरोधी पक्ष नेता यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांचा प्रश्न योग्य आहे या कालावधीमध्ये मनपाचा पाणी पुरवठा जरा विस्कळीत झाला होता यात शंका नाही. काही भागामध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. दुसरा प्रश्न आहे तो तुरटीच्या संदर्भातील असुन तुरटीची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. त्या समितीचा अहवाल स्थायी समिती पुढे ठेवू. नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. साईसफाईचे देयक देण्याचे बाकी राहीले आहे त्यामुळे साफसफाई होवू शकले नाही तरी त्यांचे पेमेंट आहे ते पेमेंट आता आपण देणार आहोत. आता साफसफाईचा विषय असणार नाही याची काळजी प्रशासनामार्फत घेण्यात येईल.

**फारुक हुसेन** मा. आयुक्त साहेब आम्ही नगरसेवक नागरीकांच्या संपर्कात राहतो. साफसफाई करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. आमच्या वार्डात आम्ही मागील चार वर्षापासुन नालीचे, रस्त्याचे कामे केले आहेत. परंतू सफाई होत नाही त्यासाठी आम्ही अडचणी आहोत. लोक आम्हाला सफाई होत नाही म्हणुन सांगतात. त्यामुळे आम्ही नागरीकापुढे निरुतर होत असतो त्या साठी सफाई नियमित करण्यात यावी. आम्ही पाणी नसल्याने सुध्दा काहि तक्रारी केल्या नाहीत परंतू या सफाई साठी नागरीकांना उत्तेर देणे अशक्य आहे. पाण्याची सुविधाआम्हाला मिळाली. पुर्ण महाराष्ट्र पाण्याकरीता परेशान होते. मनपाने आम्हाला पाणी दिले आहे. आम्हाला पाच वर्षापासुन ऐकत आहोत.

**स. शेर अली** आम्ही लेखी प्रश्न दिलेले आहेत त्याचे उत्तर देण्यात यावे. आम्हाला सभागृहाचे नियम माहिती आहेत. आमच्या साठी वेगळी भुमिका घेण्यात येत आहे असे माझे मत आहे.

**विनय गुर्रम** तुम्ही बोलत असताना आम्ही बोलत नाही मग आता आम्ही बोलत आहोत त्यासाठी आपण बोलने थांबवावे.

**महापौर** सदस्यांनी लेखी प्रश्न दिले आहेत त्याचे उत्तर आले आहे त्याचे उत्तर आपण घ्यावे. सर्वांनी शांत राहावे.

**गोंधळ सुरु होता.**

**बाळासाहेब देशमुख(संविधान पार्टी)** आम्हाला वेळ देणार की आमचा वेळ संपलेला नाही. आम्हाला बोलू दयावे.

**महापौर** गायकवाड मॅडम, आपला प्रश्न दिलेला आहे काय हे सांगावे. आपण लेखी प्रश्न दिला असेल तर त्यावर चर्चावर होईल.

पहीला प्रश्न वाचुन उत्तर वाचुन दाखविले (आयुक्त महोदय यांनी)

**विरोधी पक्ष नेता** आम्ही प्रश्न मांडावा आणि आपण उत्तर दयावे हे किती दिवस चालणार. प्रशासनाने काही काम करावे किंवा नाही. आपल्याकडे एएमआरसी आहे त्या एएमआरसी कडून काम करुन का घेत नाही. एखादया कामासाठी सदस्यांला दोन दोन वर्षा का वाट पाहावी लागते. प्रशासन का काम करत नाही. अधिकारी यांनी काम केले पाहीजे त्यांनी काम केले तर आपल्या कडे येण्याची आवश्यकता नाही हे काम करीत नाहीत म्हणुन हा प्रश्न आपल्याकडे आलेला आहे.ही वेळ येता कामा नये.याचा खुलासा करावा.

**दिपकसिंह रावत** जे महीला नगरसेविका आहेत ते वांरवार आपल्याकडे काम घेवून येवू शकत नाही त्यासाठी त्यांचे लेखी प्रश्न आल्यास त्यांचे काम तात्काळ पुर्ण करुन दयावे. एएमआरसीच्या माध्यमातून कामे होणे गरजेचे आहे.

**आयुक्त** स.सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे तो प्रश्न असा आहे की, गुरु-ता-गद्दी मध्ये रस्ता क्र 9 तयार करण्यात आला परंतू या रस्त्यावरील एक चेंबरचे काम पुर्ण करण्याचे शिल्लक राहीले आहे.सध्या पावसाचे दिवस असल्याने ते चेंबरचे काम आपणास करता येणार नाही दिनांक 30 ऑक्टोंबर नंतर पाऊस कमी झाला चेंबरचे काम करुन देण्यात येईल.

**स. शेर अली** एका चेबंर मुळे पुर्ण लाईन बंद आहे. हे काम आपण का करत नाही. आम्ही काय लावारीश आहोत काय. चेबंरचे काम त्वरीत करुन देण्यात येईल असे सांगण्यात येते. पुर्ण शहराचे ड्रेनेजची घाण आमच्या एरीयामध्ये आणुन सोडली आहे. त्यामुळे आमचे आरोग्य धोक्यात आले आहे. आमच्या एरीयाचे ड्रेनेजचे चेंबरचे काम त्वरीत करुन दयावे त्याशिवाय इतर शहराचे काम पुर्ण करुन काहीही उपयोग होणार नाही. सर्व घाण आमच्या एरीयात येत आहे. एक चेबंर कनेक्टीव्हीटी करुन देण्यात यावे. आम्ही काही लावरीश आहोत काय.

**अ. हबीब बागवान** चेंबरचे काम करुन दयावे कारण आम्ही सध्या लावरीश आहोत म्हणून आमचे काम होत नाही काय हे सांगावे. एक चेंबरचे काम करावयाचे आहे तर पुर्ण शहराची कनेक्टीव्हीटी होवून योजना यशस्वी होणार आहे.

**अब्दुल सतार** या चेंबरमध्ये मागील एका वर्षापुर्वी हादसा झाला होता. तेव्हा पासुन काम बंद आहे. कोणही काम करीत नाही हे योग्य नाही. एका चेंबरचे काम पुर्ण करुन दयावे. मोठी लाईन आहे. 70 कोटीचा एसटीपी आपण तयार केला आहे एक लाईन टाकण्याचा विषय आहे. आपण तर नविन आहात. केसीपी या कंपनी मार्फत काम करण्यात येते त्यांना सर्व परिस्थीती माहिती आहे ही कंपनी खुप मोठी आहे. तरी हे काम त्वरीत करुन देण्यात यावे.

**आयुक्त** एका चेंबरचे काम शिल्लक राहील्यामुळे जर पुर्ण शहराची कनेक्टीव्हीटी होत असेल तर वेळ न जावू देता एका चेबंरचे काम नोंव्हेबर पुर्वी करुन देण्यात यावे. असे आदेश कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागास देत आहे. त्यांनी काम पुर्ण करुन अहवाल सादर करावा.

**विनय गुर्रम** या प्रश्नाला अनुसरुनच एक प्रश्न आहे. तो प्रश्न असा की, मी आतापर्यत तीन ते चार पत्र दिले आहे. आता आपण जसे श्री अंधारे यांना तात्काळ करुन घ्यावे असे आदेशीत केले आहे. यापुर्वी देखील असेच आयुक्तांनी आदेश दिलेले होते परंतू आतापर्यत कामे झालेली नाही.माझ्या प्रभागातही कामे राहीलेली आहेत. आम्हाला आश्वासन देवू नका. आम्हाला आतापर्यत आश्वासन दिलेले आहे.

**महापौर** मा. आयुक्त साहेबांनी आश्वासन दिलेले आहे आपले काम होवून जाईल आपण खाली बसावे. आपला प्रश्न आमच्यापर्यत आला आहे.

**विनय गुर्रम** आम्हाला केवळ आश्वासन देण्यात येत आहे. हे पुर्ण करावे.

**आयुक्त** स. सदस्य श्री शेर अली यांनी जो प्रश्न उपस्थितीत केलेला आहे तो प्रश्न महेबुब नगर, शक्ती नगरचा जो प्रश्न उचलला आहे त्याचे उत्तर हे कार्यकारी अभियंता यांनी वाचुन दाखविला आहे.

**स. शेर अली** मी कीती दिवसापासुन हा प्रश्न उपस्थीत करीत आहे. केवळ लेखी उत्तर काही योग्य नाही. 15 ते 16 लक्ष रुपये खर्च करुन हे काम करुन घेणे आवश्यक होते परंतू प्रशासनातील अधिकारी हे काम करीत नाहीत. या टाकीला भरण्यासाठी शक्ती नगर पाण्याची टाकी किंवा गुरुव्दारा या ठिकाणीची टाकीला बंद करावे लागते तेव्हा ही टाकी भरण्यात येते. यामुळे आपआपासात भांडणे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. चौफाळाची टाकीचे काम पुर्ण झाल्यास या टाकीला भरण्यासाठी दोन दिवस लागु शकतात. आपआपास आम्ही भांडणे करुन घ्यावे काय. प्रशासन का कार्यवाही करीत नाही. असे कीती दिवस चालणार आहे मला सांगावे काही तरी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**महापौर** आपण करोडो रुपये खर्च करुन पाण्याच्या लाईन टाकल्या आहेत त्या लाईनला जोडणीचे काम करुन घेणे आवश्यक आहे. जोडणीचे काम करुन घ्यावे. जर हे काम झाले नाही तर लाईन टाकुन काय उपयोग आहे. नोंव्हेबर महीण्यापुर्वी सर्व जोडण्याचे काम पुर्ण करुन घेण्यात येतील.

**आयुक्त** (55.12) प्रश्नाचे उत्तर वाचुन दाखविले पाण्याची लाईन टाकण्यात येते. संबधीत कंत्राटदाराने पाण्याच्या व्यासाची पाईप लाईन टाकण्यात आलेली होती. महापौर मॅडम यांनी सांगीतल्याप्रमाणे पाण्याची पाईप लाईनच्या जोडण्याची काम करुन देण्यात येईल.

**अ. हबीब बागवान** ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईनचे काम झाले आहे त्या ठिकाणी रस्त्याचे काम करुन घेण्यात यावे. त्यासाठी का विलंब लावण्यात येत आहे याचा खुलासा करावा.

**महापौर** विशेष बाब म्हणुन अंजलीताई गायकवाड यांना बोलण्याची संधी देण्यात येते.

**सौ.अंजली गायकवाड** माझ्या वार्डामध्ये बीएसयुपी योजनेअंतर्गत ड्रेनेज लाईन झालेली आहे. ती लाईन फेल झालेली आहे लोकांच्या घरात पाणी साचून राहते. मी सर्व अधिका-यांना फोन केला आहे त्यांना वारंवार सांगीतले आहे. ते लोक ज्या ठिकाणी जेवतात त्याच ठिकाण संडासचे पाणी असते. ते पाणी पाहुन गेले पाहिजे याची उपाय योजना करावी. सोनसळे यांनी फोटो काढून आणलेला आहे. माझा दुसरा प्रश्न आहे की, माझी पर्स तपासण्यात आली ती का तपासण्यात आली ती माझीच का तपासण्यात आली मी काय गुन्हेगार आहे. मी स. सदस्य आहे. इतर लोकांची तपासली की नाही हे मला माहिती नाही याचा मला खुलासा करण्यात यावा. तीसरा प्रश्न आहे दलीत वस्तीचे 17 कोटी रुपये आले त्या पैश्याचे काय झाले आणि काय होणार आहे याची माहिती देण्यात यावी. याचा खुलासा देण्यात यावा.

**नगरसचिव** महापालिका सर्व साधारण सभेच्या मिटींगमध्ये अनवाधानाने दोन-तीन घटना घडल्या आहेत. त्या घटना भविष्यात घडू नये. अधिकारी / स.सदस्य यांचे सुरक्षेच्या दृष्टीने आपण तपासणी करण्यात येत आहे. हे आदेश मा. महापौर मनपा नांदेड यांच्या आदेशान्वये करण्यात आलेले आहे.

**अशोक उमरेकर** मा. महापौर यांचा आदेश आहे काय असल्यास तो आदेश आम्हाला दाखविण्यात यावा. पोलीसानां आपण आदेश दिले आहे. महीला सदस्यांना तपासण्याचे आपणास अधिकार आहेत. आपण तपासणी करु शकता काय याचा खुलासा करावा.

**स. शेर अली** सुरक्षेची जबाबदारी आली असे आपण सांगता. सुरक्षा कोणाची करावी हे सांगावे. ही करण्याची आपणास का आवश्यकता पडत आहे आपण काम करीत नाही हे सांगाना. त्यामुळे आपण असुरक्षीत आहोत असे वाटायला लागत आहे.

**गोंधळ चालू होता.**

**बाळासाहेब देशमुख (संविधान पार्टी)** नगरसचिवानी उत्तर देवू नये याचा खुलासा महापौरांनी दयावा. महिलांना तपासणी करण्याच अधिकार आहे. पोलीस कर्मचारी का तपासणी करीत आहे याचा खुलासा करावा.

**अशोक उमरेकर** आम्हाला चेक केले नाही काही विशिष्ठ लोकांनाच का चेक केले आहे याचा खुलासा करावा.

**बाळासाहेब देशमुख (संविधान पार्टी)** मला सुध्दा चेक केले नाही. त्यांनाच का चेक केले. काय कारण आहे त्यांना चेक करण्यात आले आहे.

**सौ. श्रध्दा चव्हाण** पुरुषांनी चेक करावयचे होते महिलांनाच का चेक केले याचा खुलासा करावा.

**विनय गिरडे पाटील** मागच्या मिटींगमध्ये काही जनानी मटन घेवून आले होते त्यामुळे पुरुषांना देखील चेक करावे.

**उमेश चव्हाण** सर्व साधारण सभेत येणा-या सर्व सदस्यांना चेक करण्याचे आदेश देण्यात यावे. तपासणी करुनच सभागृहात सोडण्यात यावे असा नियम तयार करावा.

**सभागृह नेता** मा. महापौर मॅडम आपण निर्णय घ्यावा की सर्वांना चेक करावे. त्यानुसार सर्वांची तपासणी करण्यात येईल. आपण निर्णय घेतला तर आम्ही आपल्या पाठीमागे आहोत याची काळजी करु नका. आम्ही आपल्यासोबत आहोत.

**सौ. श्रध्दा चव्हाण** सर्वाच तपासण्यात यावे एका तपासावे दुस-याला न तपासता आत सोडण्यात येत आहे एका एक आणि दुस-याला दुसरी वागणुक हे योग्य नाही. सर्वाना सारखी वागणुक दयावी.

| | |
|---|---|
| **महापौर** | मी या सभागृहाचा पिठासन अधिकारी म्हणुन आहे. पिठासन अधिकारी या नात्यांने मि तपासणी करण्याचे आदेश दिलेले होते त्यामुळे तपासणी करण्यात आली आहे ज्याच्या हाती बॅग/कॅरीबॅग आहेत त्यांना तपासले आहे. हे आदेश मि दिलेले होते. सभागृहात जो अनुचीत प्रकार झाला त्याचा अहवाल मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस अधिक्षक यांना पाठविला आहे. तपासणी करण्याचा नियम आपल्या मनपात नाही तर विधानसभा व लोकसभामध्ये देखील तपासणी होत असते. आपण नविन काहीही केलेले नाही. पुढच्या वेळेस पासुन तपासणी करण्यात येईल. महिलानी छोटया पर्स घेवून यावे. जर तपासणीला सामोर जावयाचे नसल तर. माझ्या सुरक्षेपेक्षा सर्वाच्या सुरक्षेतेसाठी केलेला नियम आहे. हे सर्व सदस्यांनी लक्षात घ्यावे. |
| **सौ. अंजली गायकवाड** | आमच्या प्रभागातील बीएसयुपी अंतर्गत झालेल्या लाईनचे काय करणार आहात याचा खुलासा करावा. |
| **महापौर** | बीएसयुपीच्या लाईन चोअकप झालेले असल्याने प्रशासनाने तात्काळ ड्रेनेजचे पाणी वाहते करुन दयावे तसेच लाईन सुध्दा दुरुस्त करुन घेण्यात यावी. |
| **आयुक्त** | डेंग्यूचा प्रश्न |

| | | |
|---|---|---|
| **डॉ. शीला सुनील कदम** | सध्या नांदेड शहरामध्ये डेंगू हया रोगांची साथ जोरात चालु आहे तरी आतापर्यंत किती डेंगूच्या पेशंटची नोंद झालेली आहेव आतापर्यंत किती पेशंट डेंगू हया रोगांनी मृत्यू पावले आहेत व त्याबददल काय प्रतिबंध उपाययोजना केलेल्या आहेत हे कळावे ही विनंती. | १) नांदेडच्या मुख्य ठिकाणी जनतेस डेंग्यु विषयी जनजागृती होण्याच्या दृष्टीने व त्यावर उपायोजना करण्याच्या दृष्टीने शहरामध्ये विविध ६ ठिकाणी मोठे होर्डीग्जस लावण्यात आले आहेत त्यामध्ये डेंग्यु आजारावर कसे मात करायचे आहे या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.<br>२) नांदेड शहरामध्ये मनपा अरोग्य विभागा अंतर्गत एकुण १६ झोन असुन त्या अंतर्गत मनपाचे वैद्यकियअधिकारी आरोग्य कर्मचारी तसेच शहरा मध्ये विशेष कंटेनर सर्व्हे मोहिम खाजगी नर्सिंग स्कुलच्या ५० विद्यार्थ्यां मार्फत १६ झोन अंतर्गत पुर्ण शहरात घरोधरी जावुन कंटेनर तपासणी व आरोग्य शिक्षण देण्यासाठी मोहिम राबविण्यात येत आहे तरी जनतेने सहकार्य करावे<br>३) नांदेड शहरामध्ये डेंग्यु विषयी जनजागृती होण्याच्या दृष्टीने शहरामधील १३८ शाळांमध्ये प्रार्थनेच्या वेळेस मनपा वैद्यकिय अधिकारी मार्फत जनजागृती व मार्गदर्शन करण्यात येत आहे.<br>४) शहरवासीयांना डेंग्यु विषयी माहिती होण्याचया दृष्टीने नांदेड शहरामध्ये विविध भागामध्ये हस्तपत्रीकाव्दारे जनतेस जनजागृती करण्यात येत आहे.<br>५) नांदेड लोकन केबल टिव्हीवरा लोकांना डेंग्यु विषयी जनजागरण होण्याच्या दृष्टीने माहिती प्रसिध्दी देण्यात आली आहे<br>६) नांदेड शहरामध्ये विविधस गणेश मंडळे ध्वनीयंत्रामार्फत ऑडीओ कॅसेट डेंग्यु विषयी जनजागृती करण्यात आली आहे.<br>७) नांदेड शहरातील रेल्वे स्टेशन, बससटॅन्ड या मुख्य गर्दीच्या ठिकाणी डेंग्यु विषयी जनजागृती होण्यासाठी ऑडीओ कॅसेटव्दारे माहिती प्रसारीत करण्यात आली.<br>८) शहरातील नाले डबकेवर तिन पथकामार्फत डासअळीनाशक औषधी फवारणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे दररोज ५ प्रभागामध्ये फवारणी करण्यात येत आहे.<br>९) शहरामध्ये कायमस्वरुपी डास उत्पतीस्थापना मध्ये गप्पीमासे सोडण्यात येत आहे.<br>१०) शहरातील खाजगी रुग्णांलयांना पत्र देवुन डेंग्यु दुषित रुग्णाबाबत दैनंदिन माहिती देण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत.<br>११) शहरामध्ये सर्व आरोग्य कर्मचा-या मार्फत दैनंदिन ताप रुग्णांचे सर्व्हेक्षण करुन रक्तनमुने व डेंग्यु सदृष्य रुग्णांचे रक्तजल नमुने घेण्यात येत आहे डेंग्यु दुषित निघालेल्या रुग्णांच्या घरी व परीसरात धुरफवारणी करण्यात येत आहे.<br>१२) नांदेड शहरा मध्ये माहे सप्टेंबर १६ मध्ये एकूण २९ डेंग्यु दुषित रुग्ण आढळलेले असुन व माहे जानेवारी १६ ते सप्टेंबर १६ पयंत एकूण ५३ डेंग्युरुग्ण आढळलेले आहे सदरील सर्व रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत.<br>१३) नांदेड शहरामध्ये १ जानेवारी १६ ते ३० सप्टेंबर १६ पर्यंत डेंग्यु आजाराने एकही मृत्यु झालेला नाही. |

| | | |
|---|---|---|
| | (११) | १४) नांदेड शहरामध्ये आरोग्य कर्मचारी व स्वयंसेवक मार्फत कंटेनर सर्व्हे करण्यात येत असुन करण्यात येत असुन १ सप्टेंबर १६ ते २९ सप्टेंबर १६ पर्यंत एकूण १६४५६ घरामध्ये ३८०२९ कंटेनर तपासण्यात आले व ७७१ घरामध्ये दुषीत कंटेनरमध्ये डेंग्यु डासाच्या अळया आढळून आले.<br>तसेंच अ.क्रं. १ ते १४ प्रमाणे शहरामध्ये डेंग्यु, चिकुनगुनियाचे प्रमाण आटोक्यात येण्यासाठी विविध उपायोजना करुन डेंग्यु या रोगावर मात करण्यात आले आहे सध्या नांदेड शहरामध्ये शासकीय प्रयोगशाळा मध्ये जानेवारी १६ ते २९ सप्टेंबर १६ पर्यंत ५३ डेंग्यु दुषित रुग्ण आढळले आहेत सर्व रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत.<br>तरी सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की सांडापाणी ८ दिवसातुन एकदा रिकामे करावे व कोरडा दिवस पाळावे जेणे करुन डेंग्यु या आजावारावर यशस्वीपणे मात करता येईल. |

**डॉ. शिला कदम** यातील ब-याच गोष्टी या कागदोपत्री आहेत. प्रत्यक्षात कार्यवाही झालेली नाही. कन्टेनरची तपासणी कोणत्या भागात झाली आहे. मी ज्या ज्या ठिकाणी चौकशी केली त्या ठिकाणी कन्टेनरची तपासणी झालेली नाही. माझ्या प्रभागामध्ये 8 रुग्न डेंग्यूच्या तापाचे आढळले आहे. त्या एरीयामध्ये कोठे कन्टेनरचा तपासणी करण्यात आली नाही. फवारणी साठी वांरवार सांगीतल्यानंतर फवारणी करण्यात आली आहे. कोणत्या भागामध्ये हे सगळे झाले याचा खुलासा दयावा. टोईम टेबल देत होतो त्याप्रमाणे फवारणी करण्यात यावी.

**सभागृह नेता** मनपाकेकडून जी उपाययोजना केली जाते त्याची माहिती संबधीत स.सदस्यांना दिली जात नाही. त्यांनी सुचना केल्यानंतर आपण काम केले तर त्याचा फिडबॅक त्यांना देण्यात यावा.

**आयुक्त** स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. संबधीत विभागास सुचना दिलेल्या आहेत 1 सप्टेंबर ते 29 सप्टेंबर पर्यतचा अहवाल आहे त्यात 38456 एवढया घराचा सर्व्हे केला आहे.यात 773 घरामध्ये दुषीत आळया आढळुन आलेल्या आहेत. एक वेळापत्रक तयार करुन त्याप्रमाणे फवारणी करण्यात येत आहे. ज्या एरीयामध्ये डेंग्युचे रुग्न आढळून आलेले आहेत त्या एरीयामध्ये सर्व्हे करण्यात येत आहे.

**महापौर** प्रत्येक वार्डात कन्टेनरची तपासणी करुन घेण्यात यावी वारंवार तक्रारी येत आहेत.

**सरजितसिंह गिल** फवारणीचे काम होत नाही केवहा कागदोपत्रीच दाखवण्यात येत आहे. शहरामध्ये अनेक भागामध्ये डेग्यूहोत आहे त्यासाठी आरोग्य अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. 40-40 लोक आहेत ते काय काम करीत आहे. मलेरीया अधिकारी काय करीत आहेत. आरोग्य अधिकारी काम करीत नाहीत.

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** माझ्या वार्डात 14 पेशन्ट होते. काहीचे निगेटीव्ह होता. ओकांरेश्वर नगर या ठिकाणचे पेशन्टचे नांव पत्ता व दवाखान्याचा पत्ता दिला होता. त्यावर आरोग्य अधिकारी यांनी काही कार्यवाही केलेली नाही. प्रभागातील नागरीक टॅक्स भरतात त्यांना मनपा आरोग्य, दिवाबत्ती व इतर सुविधा पुरविणे बंधन कारक आहे. आरोग्याच्या दृष्टीने आपण योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. एक तरी फॉगीन मशीन चालू आहे काय याचा खुलासा करावा. आरोग्याच्या दृष्टीने आपण काय सुविधा पुरविल्या आहेत याचा खुलासा करावा.

**अब्दुल सत्तार** आरोग्य अधिकारी काहिही काम करीत नाहीत. सध्या शहरात डेंग्यूचे प्रमाणात खुप वाढले आहे की काय हे मलेरीयाचे लोकांचे घरी काम करीत आहेत की काय. आता ते मोटारसायकल वर फिरत आहेत. माजी नगरसेवका यांना डेंग्यू झाला होता. मग आरोग्य अधिकारी काय काम करीत आहे. हे कळत नाही. हे मुले कोठे काम करीत आहेत हे सांगावे. महापौर/उपमहापौर यांचे कडे रोज आढावा देण्यात यावा. डॉ. शिला कदम यांनी जो प्रश्न उपस्थिती केला आहे त्यांचे मी स्वागत करतो.पदाधिकारी यांची देखील जबाबादारी आहे सर्वा नगरसेवकांनाही माहिती माळाली पाहिजे. साफसफाईचे करण्यात येत नाही ती करण्यात यावी. फॉगींन मशिन बंद आहे ती दुरुस्त करुन घेण्यात यावी.

**विरोधी पक्ष नेता** अब्दुल सत्तार साहेब हे महापौर होते त्यांनी चांगली सवय लावली असती जर ही वेल आली नसती.

**(गोंधळ चालू होता)**

**अब्दुल सत्तार** आम्ही कसे काम केले हे यांचा काही माहित नाही हे इंटरवल मधून आलेले आहेत.

**आयुक्त** सभागृहाने ज्या सुचना केल्या आहेत त्याची तत्काळ नोंद वैदयकीय अधिकारी यांनी घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**अब्दुल सत्तार** मी महापौर होतो. तेव्हा पासून हा प्रश्न सुरु आहे तेव्हा तत्काळ हा प्रश्न सोडविण्यात यावा.

**आयुक्त** फारुख हूसैन यांनी पाचवा प्रश्न वाचुन दाखवला........

**फारुक हुसेन** ही बीएसयुपी मधली लाईन नसुन एएमआरसी मधून करावी, अधिकारी काम करीत नाहीत.

**आयुक्त** स.सदस्याच्या भावना लक्षात घेवून कार्यकारी अभियंत्यांने याची नोंद घ्यावी. अधिक्षक अभियंता यांच्या अधिनस्त हे काम करतील.

**फारुक हुसेन** हे काम पुर्ण करण्यासाठी मला तारीख देण्यात यावी.

**आयुक्त** प्र क्र 8 आंनद चव्हाण वाचुन दाखवावा.

**आनंद चव्हाण** मी दोन महिण्यापुर्वी याबाबत पत्र दिले होते, झोन एबीसीडीमध्ये काय झाले. यातील अनधिकृत बांधकामे करत आहेत. पुण्याचा बिल्डर नांदेडमध्ये काम करत आहे. मोठ-मोठया जाहीराती लावत आहे. आणि सर्व सामान्य नागरीकांना सदनिका विकत आहे. अनधिकृत असल्यामुळे त्यांच्या भुर्दंड नागरीकांना सोसावा लागत आहे. या बिल्डरवर काय कार्यवाही करणार याचा खुलासा करावा. आपले इमारत निरीक्षक काय काम करीत आहेत ते नियंत्रण का ठेवत नाही त्यांना दोषी ठरवून कार्यवाही करावी.

**आयुक्त** झोन एबीसीडी जी बांधकामे सुरु आहेत. त्यांच्यावर ओनरशिप अक्टनुसार संबधीत बिल्डरवर कार्यवाही करण्यात येईल शहरात होणा-या अनधिकृत बांधकामाची चालू आहेत ते बांधकामे त्वरीत पाडण्यात येतील त्यावर आम्ही कार्यवाही करणार आहोत.

**आंनद चव्हाण** इमारत निरीक्षकावर आपण काय कार्यवाही करणार आहात त्यांनी या बांधकामा बढावा दिला आहे.

**आयुक्त** जे इमारत निरिक्षक दोषी आढळतील त्यावर निश्चित कार्यवाही करण्यात येईल.

**दिपकसिंह रावत** एखादा बिल्डर आहे त्यांच्यावर आपण का कार्यवाही करत नाही. सर्व सामान्य नागरीका हा सदनिका होत असतांना बॅंकाचे कर्ज घेवून घर घेतो त्याची काय चुक आहे. जेवढी चुक ज्या बिल्डरची आहे त्यावर आपण दंड का लावत नाह. अधिका-याला कमीत कमी 25000/- रुपये दंड लावण्यात येते. तो का लावत नाही.

**उमेश चव्हाण** नांदेड शहराला किती एफएसआय आहेत. आपण एफएसआय मध्ये वाढ करु त्यामुळे आपला फायदा होवून मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढेल. नगरसेवकाच्या तक्रारी देखील कमी होतील बांधकाम परवानग्या किती पेंडीग पडलेल्या आहेत याची माहीती देण्यात यावी.

**सभागृह नेता** शहरात अनधिकृत बांधकामे होत असताना ती पाडण्यात यावी असे आपण नेहमी म्हणतो मनपाच्या इमारतीही अनधिकृत आहेत ती कुठे आहे ते सांगणे उचीत नाही. बिल्डर हे अनधिकृत बिल्डींग बांधकात आणि सर्वसामान्यना विकतात त्या बिल्डरवार आपण कार्यवाही का करत नाही ते हार्डशिप सुध्दा करुन घेत नाहीत त्यामुळे मनपाचे आर्थिक उत्पन्न कमी होत आहे.एफएसआय आता कोणी बांधत नाही हार्डशिपमधुन काम करुन घेतले पाहीजे. आपण असे काही करत नाही.

**स. सरजितसिंह गिल** मागील 5 महिण्यापासुन बांधकाम परवानग्या थांबल्या आहेत. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच बिल्डरपासुनही नुकसान होत आहे. महाराजा रणजितसिंघ मार्केटही अनधिकृत आहे ते बीओटी वर देण्यात आले आहे. त्यामुळे थाटात उदघाटने होत आहेत. सर्व जाती धर्माचे लोक महराजा रणजितसिंघ यांच्या मंत्रीमंडळात होते परंतू या बिल्डरनी त्यांचे नांव त्या मार्केटला लिहलेले नव्हते. दोन महिण्याला दुकानाचे उदघाटन होत आहेत आपण त्यांना रजिष्ट्री का करुन देत नाहीत आपला टक्स का वसुल करुन घेतला जात नाही त्यामुळे मनपाचे नुकसान होत आहे अग्रवाल मार्केटचे नांव देखील त्यांनी सन्मान टावर केले होते असे नांव बदलता येत नाही दोन समाजामध्ये वाद झाला असता. मनपा सक्षम नाही का ? शिख समहाच्या लोकांनी नांव टाकुन घेतले तो अरोबो रुपये कमावत आहे. तो हार्डशिपमध्ये पण येत नाही आपणाला 3 ते 4 करोड रुपये येवू शकतील. बांधकाम परवानगी घेतील नाही. 2-3 रुमचे घरबांधल्यावर आपले इमारत निरीक्षक कार्यवाही करतात.ते मालकाना झाले आहेत त्यावर कार्यवाही करण्यात यावी. बिल्डरला दंड लावला पाहिजे. मा.महापौर व आयुक्त साहेब आपणास माझी ही विनंती आहे.

**अब्दुल सत्तार** मोठ-मोठे बिल्डरला नोटीसा देता येतात की नाही हे सांगावे फि सुध्दा भरण्याची आवश्यकता नाही काय. बीओटी तत्वावर काम करून घेतले आहे. बीओटी तत्वाची बांधकाम परवानगी घेतली रणजितसिंघ मार्केटची का घेतली नाही. त्यामुळे निधी बुडाला आहे अधिका-यांनी बांधकाम परवानगी घेवू नये असे म्हणत होते. आपण एक चांगले अधिकारी आपण महसूल बुडवणार नाही असे आम्हाला वाटते. आपणला पैसे वापस करण्याची वेळ आली आहे तेथे काही तेथे काही घटना घडली तर आपण काय उत्तर देणार आहोत. आनंद चव्हाण यांचे अभिनंदन करतो त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला आपल्याकडे 500 बांधकाम परवानगीच्या फाईल थांबलेल्या आहेत त्यामुळे लोक हे अनधिकृत लोक हे अनधिकृत बांधकामे करु शकतात. मा. श्री जी.श्रीकांत यांनी एक कलम लिहलेले आहे त्यानुसार अग्रवाल मार्केट हे आपल्या ताब्यात ठेवण्यात यावे मनपाला एकही रेस्ट हाऊस नाही आताचया आता ताब्यात घेण्यात यावे त्यांना आवश्यकता असेल तर त्यांच्याकडून आपण पैसे भरुन घ्यावे.

**सभागृह नेता** टेंडर क्लॉज प्रमाणे इंक्रीमेंटल एफएसआयचा फायदा मनपाला झाला पाहिजे परवानगी देण्यात येवू नये असे म्हणाले होते. अधिकच्या एफएसआयची वसुली त्यांच्याकडून करुन घेण्यात यावी.कंत्राटदाराला ते आम्हाला दयायचे नाही जो खर्च आहे तो मनपा दयावा.

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** 2012 ला एक ठराव पारीत झाला त्या ठराव क्र 98 मंजूर केला आहे. महाराजा रणजितसिंघ मार्केटचा होता. या मार्केटला हार्डशीपचा फायदा देण्यात येवू नये ते बांधकाम पाडण्यात यावे असा झाला होता. आम्ही माहीती घेतली असता बांधकाम परवानगरी देण्यात आली नाही असे आम्हास प्रशासनाने सांगीतले परवानगी नाही हार्डशिप नाही मग इमारत उभी कशी राहीली याचा खुलासा करावा. हाय कोर्ट, सुप्रीम कोर्टमध्ये गेले होते.

मग काय त्याचा आपण कॅंपाकोला करावयाचे आहे काय मग कॅंपाकोला पडली मग हेही पाडणार काय. रजिष्ट्रीची किंमत सुध्दा भरली नाही. प्रशासन हे गुत्तेदाराच्या मनपावर चालते काय. विहित मुदतीत काम पुर्ण झाले का. कंत्राटदाराच्या मनावर चालते की मनपाच्या मनावर याचा खुलासा करावा.

**स. शेर अली** हे जेव्हा बांधकाम चालू होते त्यावेळेस 53 – 54 ची कार्यवाही करण्यात यावी. इमारत निरीक्षकने 53,54 ची कार्यवाही का केली नाही.

**विरोधी पक्ष नेता** यावर कार्यवाही होईल काय. ही इमारत पाडणार आहात काय तुम्ही ताब्यात जर घेतली तर महापौरांचे व आयुक्तांचे मी याच ठिकाणी अभिनंदन करतो. बांधकाम परवानगी घेतली नाही त्या दोषीवर कार्यवाही करणार की नाही. काही हादसा जर झाला व कोर्टात प्रकरण गेले तर मनपा याचा जबाबदार राहील. त्या कंत्राटदाराला दंडासहीत वसूली करावी यासाठी सभागृहाची संमती आहे.

**आयुक्त** मनपा हददीत इमारत उभी राहते त्या इमारतीची रितसर परवानगी घेतली पाहिजे. जे कोणी दोषी असतील त्यावर निश्चीतपणे कार्यवाही करण्यात येईल.

**अशोक उमरेकर** शहरातील डॉक्टरलाईन मध्ये मोठया प्रमावावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यावर कार्यवाही करणार की नाही हे डॉक्टर लोक खेडयातील लोकांकडून मोठया प्रमाणात पैसे वसूल करतात त्यांच्यावर कार्यवाही का करण्यात येत नाही या डॉक्टरांनी अंडरग्राउंड पार्कींगमध्ये लॅब केलेली आहे ते अनधिकृत आहे. या सर्वावर कार्यवाही करावी त्यामुळे आपणास कर्ज घेण्याची गरज पडणार नाही एवढे उत्पन होईल.

**विनय गुर्रम** सर्व पदाधिका-याचे मी अभिनंदन करतो. त्यांना उशिरा का होईना ही गोष्ट लक्षात आली. गेल्या मीटींगमध्ये माझा आवाज दाबण्यात आला होता. मी हा प्रश्न उपस्थित केला होता. सर्वसाधारण सभेनंतर, स्थायी समिती हे सर्वात मोठी सभा आहे. बरेचसे असे विषय असतात की, स्थायी समितीला निर्णय घेण्याचे अधिकार असतात. मी जे लेखी दिलेले आहे त्यावर आपण कधी कार्यवाही करणार हे सांगावे.

**सभागृह नेता** लेखी तक्रार येतात त्याचा मागचा हेतू तपासला पाहीजे जर ते सार्वजनिक कामासाठी असेल तर त्यावर निश्चीत कार्यवाही केली पाहीजे.

**गोंधळ चालू होता.**

**आयुक्त** एखादया तक्रारीमध्ये तथ्य असेल तर त्यावर निश्चीत कार्यवाही करण्यात येईल.

**उमेश चव्हाण** स्थायी समितीमध्ये आपण अनधिकृत बांधकामाविषयी चर्चा करता येत नाही असे उपआयुक्त हे म्हणाले होते. असे त्यांना म्हणण्याचा कोणताही अधिकार नाही.

**गोंधळ सुरु होता.**

**आयुक्त** मा. महापौराच्या परवानगीने नांदेड जिल्हयाच्या दौ-यावर राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदय हे येणार असल्यामुळे मी सभागृह सोडत आहे. उप आयुक्त विकास यांनी प्रशासनाच्या वतीने सभेत उपस्थित रहावे.

**प्राधिकृत अधिकारी तथा उपआयुक्त (विकास)** डॉ. करुणा जमदाडे यांचा प्रश्न दाखवला.

**डॉ.करुणा जमदाडे** दिनांक 17.9.2014 ला मनपाच्य सभेत वाघाळा या प्रभागाची अत्यंत बिकट अवस्था आहे.

**गोंधळ सुरु होता.**

वाघाळा हे गाव मनपाच्या हददीत असुन मनपात आपण विविध योजना राबवित आहोत. लोक सर्वेला येताता तेव्हा हेच का वाघाळा गाव असे विचारतात तेव्हा मला मान खाली घालावी लागते. माझ्या प्रभागाची फार वाईट अवस्था आहे. मला माहित आहे की, 100 टक्के प्रश्न सोडवता येत नाहीत परंतू थोडे तरी प्रश्न सोडवले पाहीजे अशी माझी इच्छा आहे. आज चार वर्ष पुर्ण झाली एकही काम पुर्ण पणे मार्गी लागलेले नाही ही माझी इच्छा नसुन तेथील नागरीकांची इच्छा आहे. माझ्या प्रभागात रस्ते, ड्रेनेज पाणी,लाईट, नाल्या यापैकी एक तरी समस्याचे अनधिकृत बांधकामाचे प्रश्न सोडवले पाहीजे होते. परंतू हे काही प्रश्न सुरटत नाहीत. बजेट नाही असे आपण म्हणतो असे असतानाही बरेच कामे होत असतात. किमान एक टक्कातरी काम माझे व्हावे अशी माझी इच्छा आहे. एखादा त्या ठिकाणी कमान तरी उभी करावी म्हणजे ते गांव समजले पाहीजे. मला यावरुन एक शेर आठवते.

बादलो को आने की साजीश हुई<br>
हर एक को घर मे जाने की साजीश हुई.<br>
जिन के घर मिटटी के थे उनी के घर साजीश हुई.

माझा प्रभाग आरक्षीत प्रभाग आहे मला न्याय मीळत नाही. माझ्यावर अन्याय होतो असे मला वारंवार वाटते. माझ्या प्रभागातील कामे केव्हा करणार आहेत याचा खुलासा करण्यात यावा.

**प्राधिकृत अधिकारी** स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यांच्या प्रभागातील कामे ही बीएसयुपी, जेएनएनयुआरएम मार्फत हाती घेण्यात आले आहेत. जेएनएनयुआरएमचे दुस-या टप्प्यातील काम प्रगती पथावर आहे. त्या योजनेचे काम पुर्ण झाल्यावर त्या ठिकाणी सुविधा उपलब्ध होवू शकतील.

**डॉ.करुणा जमदाडे** मुलभुत सुविधा अजिबात पुरविण्यात आलेल्या नाहीत. आम्ही निवडून आल्यापासुन वारंवार सांगत आहोत की, ड्रेनेजचे काम करावे म्हणुन पण काम होत नाही.

**प्राधिकृत अधिकारी** जेएनएनयुआरएम ड्रेनेजचे काम सध्या चालू आहे. ड्रेनेज लाईनची समस्या काही कालावधीमध्येच सुटणार आहे. बीएसयुपीच्या इन्फ्रास्ट्रक्चरचे जे काम आहे ते शहरातील 65 टक्के भागात करावयाचे शिल्लक राहीले ते निधी अभावी. जसा निधी उपलब्ध होईल जसे हे कामे पुर्ण करण्यात येतील.

**डॉ.करुणा जमदाडे** मी केवळ एक टक्का कामाची आपणाकडून पुर्ण करुन देण्याची मागणी करत आहे त्यासाठी किती कालावधी लागेल याची तारीख देण्यात यावी.

**प्राधिकृत अधिकारी** श्री गिरडे पाटील यांनी मांडलेला प्रश्न.

साधारणतः दिपवालीनंतर फेरनिवीदा मागवण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

**विनय गिरडे पाटील** स्थायी समितीला निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यामध्ये एबीसी असे तीन झोनच्या मागवील्या होत्या. त्याच्यानंतर तीन वेळेस निविदा मागवुनही आपल्याकडे एकही गुत्तेदार आलेला नाही. जे गुत्तेदार आले होते त्याची माहिती स्थायी समिती पुढे आली होती. मनपाच्या नियम व अटी आपण लावल्या होत्या मुळे ही निविदा भरण्यात जास्त लोक आलेल्या नाहीत त्यामध्ये एकच निविदा भरण्यात आली होती त्याचा निर्णय घेण्यासाठी स्थायी समोर ठेवण्यात आली होती. त्यावेळस स्थायी समितीने असा निर्णय दिला होता की दुसरी निविदा मागवण्यात यावी. इतर मनपाकडे मोठया संख्येने लोक काम करण्यासाठी निविदा भरतात. परंतू मनपाने ज्या अटी टाकल्या होत्या त्या अटीमुळे कोणीही निविदा भरण्यासाठी पुढे येत नाही हे लक्षात आले निविदेच्या कोणत्या अटी आहेत. त्यामुळे कोणीही आपल्या कडे येत नाही. अशा यापुर्वी काय घटना घडलेल्या आहेत की, आपल्याकडे कुणी येत नाही. आताच्या कंत्राटदाराला आपण पुर्ण पैसे देतो. तरी आपल्याकडे कोणी का येत नाही. जर यांच्या वारंवार तक्रारी आल्या तर त्याला आपण एका वर्षाच्या आत काढू शकतो पण या एजन्सीच्या तर अनेक तक्रारी आहेत. तरी त्याला का ठेवण्यात आले आहे दिनांक 30.6.2015 ला दुसरी निवीदा काढण्यात यावी असे सांगीतले तरी ती काढली नाही. आज जवळपास पंधरा महीने होवून गेले तरीही निविदा का काढली नाही. आता दसरा-दिवाळी आहे आणि मागे पावसाळा होता त्यामुळे एजन्सी बदलणे शक्य नाही, कधी पावसाळा, कधी सण असे सांगीतले जाते. तरी आज पासुन टेंडर प्रक्रीया सुरु करुन तया एजन्सीला काढुन टाकावे. 2 ऑक्टोबर आपण स्वच्छता अभियान राबवल होत. मग काय आपले कर्मचारी स्वच्छता करतील तर त्यांनी काय करतात. प्रशासनाच्या मार्फत आपण आता तरी गंभीर आहात काय. मलेरीया डेंगु या सारखे आजार पसरत आहेत स्वच्छता होत नाही. लोक नगरसेवकाला फोन करतात. नगरसेवकाने फोन लावल्यावरच कचरा उचलला जातो. नगरसेवक निविदा काढत नाहीत अधिकार प्रशासनाचे आहेत. तरीही या एजन्सीला का ठेवण्यात येत आहे. याचा खुलासा करावा. मा. मुख्यमंत्री महोदय नांदेडला येत असल्याने हा प्रश्न मी पुढील सभेत ठेवण्याची विनंती केली होती.

**प्राधिकृत अधिकारी** लेखी कळवल्याप्रमाणे निविदा प्रक्रिया एका महिण्याच्या आत सुरु करण्यात येईल. नियम व अटीच्या अभ्यास करुन या शहरात जास्त प्रमाणात सफाईचे कंत्राट घेण्याकरीता कस जास्त येतील याची काळजी घेण्यात येईल.

**प्राधिकृत अधिकारी** जागेचे कागदपत्रे देण्यात यावी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**सौ.रजिया बेगम** निधी उपलबध आहे. जागा उपलब्ध आहे त्यामुळे अंगणवाडीला आताच्या आता मान्यता देण्यात यावी.

**महापौर** जागे चे कागदपत्र देण्यात यावी.

**सौ.रजिया बेगम** आम्ही वारंवार आमच्या प्रभागाचे प्रश्न मांडतो. त्यावर कार्यवाही होणार की, नाही हे आम्हाला सांगावे. आम्हाला लोकांनी निवडून दिलेले आहे. कच-याचे ढिगारे अनेक आहेत त्यात आळया होई पर्यत त्या ढिगा-यांना कोणीही मनपाचे सफाई विभागाचे कचरा उचलत नाहीत. डीआरडीएचे लाभार्थी आहेत ते सुध्दा खुप वाट पाहत आहेत मी आरक्षीत वार्डातून निवडून आलेली आहे. दलीत वस्तीचा निधी मागे वापस गेला आहे. त्या दलितवस्तीचे कामे होणार आहेत की नाहीत. दलीत वस्तीचा आता निधी परत आला आहे. त्यामुळे आतातरी कामे करावे.

**गोंधळ चालू होता.**

**विरोधी पक्षनेता** दलीत वस्तीचा निधी वापस जाण्याचे कारण काय होते. दक्षिणचे आमदार यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता तो निधी परत जाण्याचे कामरण काय आहे. हे पैसे पुन्हा दिवाकर रावते साहेबांने परत आनले आहेत अदयापही पैसे का खर्च होत नाही. हे तुम्हाला या शहराचा विकास करावयाचा नाही काय.

**बाळासोब देशमुख(संविधान पार्टी)**दिड वर्षामध्ये काम आपले केले नाही आपणास पैसे खर्च करावयाचे नाही काय याचा खुलासा करावा.

**गोंधळ चालू होता.**

आपण या ठिकानी पैसे मागणी करता त्या ठिकाणी पैश्याची मागणी करता मग आलेले पैसे का खर्च करत नाही याचाही खुलासा करण्यात यावा.

**पुन्हा गोंधळ सुरु होता.**

**अशोक उमरेकर** दलीतवस्तीच्या रक्कम का खर्च केली नाही याचा खुलासा करावा.

**डॉ.करुणा जमदाडे** दलीतवस्तीच्या रक्कम का खर्च केली नाही याचा खुलासा करावा.

**सौ. रजिया बेगम** दलीतवस्तीच्या रक्कम का खर्च केली नाही याचा खुलासा करावा.

**बाळासोब देशमुख(संविधान पार्टी)** दलितवस्तीचा खुलासा करावा मी मिटींग चालू देणार नाही मला निलबिंत केले तरी चालेल. 17 कोटीचा निधी येवून ही का खर्च करत नाही.

**संजय मोरे** मा. जिल्हाधिकारी कार्यालयात जावून चौकशी करावी.

**गोंधळ चालू होता.**

**महापौर** श्री बाळासाहेब तुम्ही खाली बसा इतरांना बोलू दया.

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** आमचे प्रश्न माडण्यासाठी आम्ही उभे आहोत. आमच्या गरीब बांधवाचा पैसा का खर्च करत नाही हे सांगावे.

**गोंधळ चालू होता.**

**महापौर** दलित वस्तीचे जूने प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवलेले आहेत प्रशासन त्यावर अहवाल देईल. त्यांनतर ती कामे करण्यात येतील.

**गफार खान** मा. महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व गट नेते, इंचार्ज आयुक्त साहेब आता जे दिशाभुल करण्याचे उत्तर महापौराचे आलेले आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांने 10 कोटी 56 लक्ष मागील वर्षाचा दलित वस्ती निधी वापस केला. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तीन वेळेस पत्र मा. महापौर व आयुक्त यांना आलेले आहे की, आपण यादी दयावी म्हणून सभागृहाच्या ठरावाच्या माध्यमातून कलेक्टर ऑफीसला यादी महापौराच्या माध्यमातून मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना देण्यात येते. मा. महापौर यांना आम्ही अधिकार देत आहोत आणि लाचार हे आम्हाला करीत आहेत ही सभागृहाची सिस्टीम आहे काय. माझ्या सगळया पार्टी प्रमुखाला विनंती आहे की, लाचारीवाले काम आपण महापौराला अधिकार देवून करण्यात येवू नये. मग आम्ही रोज दलितवस्तीच्या कामाबददल महापौराकडे जावून वांरवार चौकशी करतो आमच्या मनपाकडे एकुण 30 कोटीचा निधी येवून पडलेला आहे. आम्ही जिम्मेदार सर्व सदस्य त्यात विरोधी पक्षनेत्यासहीत सोळा नगरसेवकांच्या सहीचे पत्र महापौर व आयुक्त यांना दिले की, येणा-या एमएलसीच्या निवडणुकी पुर्वी निर्णय घ्यावा केवळ टाइमपास करण्यात येत आहे. मी बोलत आहे म्हणुन तुम्ही माझ्या वार्डासाठी निधी देणार नाही. पण निधी मिळाला नाही तरी चालेल पण तो इतर नगरासाठी खर्च झाला पाहीजे पंचशील नगर हा 81 टक्के दलीतवस्तीचा भाग आहे व हे म्हणतात सर्वेसाठी पाठवले याची काय आवश्यकता आहे. मा. महापौरालाच देण्यात आलेले अधिकार हे मी संगळयाच्या संमतीने सुचक म्हणुन मी मांडतो. याला सर्वाचे अनुमोदन राहील. हे सर्व अधिकार सभागृहाला राहतील (टेबल वाजून संमती दिली) आमचे माजी महापौर यांच्या काळात 25 कोटी रुपये त्यांच्या अध्यक्षतेखाली वाटप करुन शहराचा विकास करण्यात आला होता आम्हाला लोकांच्या समोर जावे लागते त्यामुळे विकास कामे करणे गरजेचे आहे. सर्वाचे या विषयावार अनुमोदन आहे.

**विरोधी पक्षनेता** आमचे अनुमोदन आहे.

**अशोक उमरेकर** मा. महापौर महोदयाकडून आम्हाला गलत उत्तर मिळत आहेत हे चुक आहे. श्री गफार खान साहेबांनी चांगली भुमिका मांडली त्याबददल त्यांचे अभिनंदन.

**अब्दुल सत्तार** कोणाला कितीही निधी मिळो ते सर्व अधिकार सभागृहाला राहतील गट नेत्याला राहणार नाही व इतर कोणालाही राहणार ही तो अधिकार फक्त सभागृहाला राहील. आम्ही लोकांचे प्रतिनिधी आहोत. आमचा हक्क तुम्ही ओढवून घेवू शकत नाही तुम्हाला दिलेले अधिकार आम्ही काढुन घेत आहोत.

**विरोधी पक्षनेता** आम्ही आपणास अधिकार देतो. तर शासनाकडून आलेला निधी योग्य रितीने खर्च झाला पाहीजे. तसे होताना दिसुन येत नाही. आपणास दिलेले सर्व अधिकार काढुन घेत आहोत. सर्व पक्षीय गटनेता हे आमच्या बाजूने आहेत. आम्ही प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठवतो.

**गफार खान** शासनाकडून 3 कोटीचा निधी आलेला आहे. त्यामध्ये गल्लीतील अंतर्गत रस्ते हॉट मिक्सचे करण्यात यावे. तुम्हाला काही कळत नाही. तुम्हाला आम्ही सांगतो असे आम्हाला महापौर म्हणतात. आम्ही या सभागृहात 25 वर्षापासुन काम करीत आहोत.

**दिपकसिंह रावत** आपण प्रस्ताव पाठवला काय याचा खुलासा करावा त्यांनतर कार्यवाही करावी अधिका-याने प्रस्ताव पाठवला काय याचा खुलासा करावा नगरसचिव यांनी प्रथम सांगावे.

**गोंधळ सुरु होता.**

**बाळासोब देशमुख(संविधान पार्टी)** आम्ही मीटींग चालू देणार नाही.(स.सदस्य डायस समोर आले)

**महापौर** सभा पुढे ढकलण्यात येते राष्ट्रगीत सुरु करावे.
शेवटी राष्ट्रगीत म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| नावाशमनपा नांदेड | नावाशमनपा नांदेड |